बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध

प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5

टेलि - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 487

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे विशेष ग्राहक संमेलन – " महाग्राहक परिचर्चा "

**पुणे, दिनांक 16 नोव्हेंबर २०२१:** देशातील एक अग्रगण्य राष्ट्रीयीकृत बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे बँकेच्या देशभरातील सर्व शाखा व विभागीय कार्यालयांमध्ये " महाग्राहक परिचर्चा " हा ग्राहक सभा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला होता. ग्राहकांशी नाते वर्धिष्णु जोड़ण्याच्या उद्देशाने पोलीस कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून बँक ऑफ महाराष्ट्र आपल्या १९९९ शाखा व ४० विभागीय कार्यालयांच्या मार्फत ग्राहकांच्या पर्यंत पोहोचण्याचा व त्यांच्याशी जोडून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. स्थानिक पोलीस ठाण्यांचे प्रमुख, पोलीस अधीक्षक, पोलीस उपाधीक्षक, पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त, सहायक पोलीस आयुक्त अशा विविध स्तरांवरील पोलीस अधिकाऱ्यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करून पोलीस बंधूंच्या उल्लेखनीय कामगिरी व निस्वार्थ सेवा निष्ठा व निष्ठेसाठी बँकेतर्फे कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा व श्री ए बी विजयकुमार हे अनुक्रमे पुणे व मुंबई येथे झालेल्या या विशेष उपक्रमांच्या अंतर्गत आयोजीत ग्राहक सभांमध्ये उपस्थित होते. पुणे शहर व दक्षिण मुंबई विभागीय कार्यालयात झालेल्या या महाग्राहक परिचर्चेत भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी पुणे व मुंबई शहराच्या पोलीस अधीक्षक अनुक्रमे पल्लवि रवींद्र बर्गे व वाहतूक पोलीस अधीक्षक श्रीमती सुनीता सालुंके ठाकरे हे परिचर्चेत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बँकेचे सरव्यवस्थापक श्री व्ही डी कोल्हटकर; श्री संजय रूद्र व श्री मनोज करे हे देखील अनुक्रमे पुणे शहर व दक्षिण मुंबई विभागीय कार्यालयातुन उपस्थित होते .

पुणे येथे झालेल्या महा ग्राहक परिचर्चा कार्यक्रमात बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांनी , सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँकांमध्ये व्यवसाय वाढीच्या सर्व निकषांमध्ये बँक ऑफ महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर असून बँकेचे सर्व सन्माननीय ग्राहक व समर्पित वृत्तीने काम करणारे बँकेचे कर्मचारी यांनाच ह्याचे संपूर्ण श्रेय जाते, असे सांगितले. बँकिंग व्यवहार अत्यंत सुरक्षित राहतील याची काळजी घेतानाच ग्राहकाना सर्व सोयी व सुविधा मिळून बँकिंग व्यवहार आनंददायी होण्यासाठी डिजिटल माध्यमांचा वापर करून ग्राहक केन्द्री योजना सादर करण्यासाठी बँक नेहमीच प्रयत्नशील राहील असे प्रतिपादन श्री हेमंत टम्टा यांनी केले.

बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी सामान्य माणूस व देशाची सेवा करीत असतानाच बँक सार्वजनिक पैशांची राखणदार असल्याचे प्रतिपादन केले. तसेच बँकेच्या सर्व सन्माननीय ग्राहकांची सुरक्षितता व त्यांच्या ठेवी सुरक्षित राखणे ही बँकेची नैतिक जबाबदारी व कायदेशीर उत्तरदायित्व असल्याचे सांगितले. समाजाला सुरक्षित व प्रगतीपथावर ठेवण्यासाठी पोलीस दले देत असलेल्या निस्वार्थ सेवेबद्दल श्री

विजयकुमार यांनी पोलिसांचे आभार मानले व सर्वांनी त्यांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले. तसेच बँकेला सातत्याने पाठबळ देऊन बँकेचा आतापर्यंतचा उल्लेखनीय प्रवास शक्य करण्यासाठी बँकेच्या ग्राहकांचे सुद्धा आभार मानले. ग्राहकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड न करता डिजिटल बँकिंग व सचोटी निर्देशांकात अव्वल क्रमांक राखण्यासाठी बँक नेहमीच कटिबद्ध राहील असे मत त्यांनी व्यक्त केले.




**फोटो मध्ये:**

फोटो 1 (डावीकडून उजवीकडे)- पुणे

1. श्री हेमंत टमटा, कार्यकारी संचालक, बँक ऑफ महाराष्ट्र
2. कु. पल्लवी रवींद्र बर्गे, पोलीस अधीक्षक (कायदा व संशोधन), सीआयडी, पुणे
3. श्री व्ही. डी. कोल्हटकर, महाव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र

फोटो २ (डावीकडून उजवीकडे)- मुंबई

1. श्री. संजय रुद्र, महाव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र
2. श्री. ए बी विजयकुमार, कार्यकारी संचालक, बँक ऑफ महाराष्ट्र
3. श्रीमती. सुनीता साळुंके-ठाकरे IPS, पोलीस अधीक्षक (वाहतूक), मुंबई
4. श्री मनोज करे, महाव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र